# ज्ञानदानयज्ञ

माझे पति श्री दिलीप धारगळकर यांची खूप इच्छा होती की मी जसा सोप्या भाषेत ज्योतिषाचा वर्ग घेत असे तशी काही पुस्तके काढावीत. पण मेडिकल डॉक्टर असल्याने वेळच मिळाला नाही. आता क्लिनिक बंद केल्यावर वेळ मिळाला पण कोविड १९ ने हैदोस घातला.

म्हणून हा ज्ञानदानयज्ञ.

यात ज्योतिष, आयुर्वेद, योग, ग्रंथवाचन, तसेच जपानी भाषेचे व्याकरण, संहिता भाषांतर अशा बाबींच्या पुस्तिकांचे हवन करून असे साहित्य आवडणाऱ्या वाचकवर्गाला तृप्त करावे हा विचार आहे.

श्री दिलीप धारगळकर



अचानकच हृदय बंद पडल्याने भर गुढीपाडव्याच्या शुभ दिनी दि. १३ एप्रिल २०२१ रोजी जीवनज्योत विझलेल्या माझ्या पतींच्या स्मृतीला माझा ह्या ज्ञानदानयज्ञाचा प्रथम हवनाविष्कार सादर अर्पण

डॉ. नंदिनी धारगळकर

# कुंडली कशी मांडावी

पंचांग असले की कोणाचीही कुंडली मांडणे अगदी सोपे. आज या पुस्तिकेत आपण ती कशी मांडायची ते पाहणार आहोत. ज्या तारखेची व वेळेची कुंडली आपणास मांडायची आहे त्या तारखेचे सोलापूर येथील दाते यांचे पंचांग असले की झाले.

या पुस्तिकेत आपण केवळ ज्याला ठोकळा कुंडली म्हणतात, ती मांडायला शिकणे; इतकेच उद्दिष्ट राबविणार आहोत. बाकी स्पष्ट ग्रह, सायन निरयन भाव इ बाबी नंतर शिकण्यासाठी बाजूला ठेवणार आहोत. ज्योतिष न येणारा सूद्धा अशी कुंडली या पुस्तिकेच्या सहाय्याने सहज मांडू शकेल.

ज्याची कुंडली मांडायची त्याला जातक असे म्हणतात

सर्वप्रथम कुंडली मांडण्यासाठी लागणारे साहित्य आपण पाहू:

१.ज्या वर्षाची कुंडली मांडायची असेल त्या वर्षाचे दाते पंचांग
२.जातकाचा जन्मदिवस
३.जातकाची जन्मवेळ
४.जातकाचे जन्मस्थळ

- आपण १५ ऑगस्ट १९१७ अशी तारीख घेऊ
- वेळ दुपारी १२ घेऊ
- स्थळ मुद्दाम सोलापूर न घेता पुणे घेऊ

आता वरील साहित्याप्रमाणे आपणास सोलापूरचे दाते यांचे २०१७ – २०१८ सालचे पंचाग लागेल. कारण ऑगस्ट महिना येतो पाडव्यानंतर आणि नव्या वर्षाचे पंचांग गुढी पाडव्याला पुजून वापरायला काढतात कारण आपले नवे वर्ष गुढी पाडव्याला सुरू होते.

पुढील चित्रात दिल्याप्रमाणे आपण पंचांग घेतले असे समजू.

समजा कोणाला पंचांग वाचत येत नसेल तरीही पुढे दिलेल्या सूचनांचा नीट अभ्यास केला तर वरील कुंडली मांडणे सोपेच जाईल

कागदावर नेहमी ‘श्री गणेयाय नमः’ असे अथवा ॐ असे लिहून कुंडली मांडायला सुरुवात करावी. त्याखाली जातकाचे नाव, जन्मदिनांक, जन्मवेळ व जन्म ठिकाण लिहून मग कुंडलीच्या भावांचा आलेख काढावा.

जसे:

---


।। श्री गणेशाय नमः।।

जातकनाम:

जन्मदिनांक: १५ ऑगस्ट २०१७

जन्मवेळ: दुपारी १२ भारतीय प्रमाण वेळेप्रमाणे

जन्मठिकाण: पुणे पू




---

ठोकळा कुंडली मांडण्याच्या पायऱ्या अशा:

१.वरील आकृतीत प्रथम योग्य रीतीने राशी भरणे
२.त्या राशींमध्ये कोणते ग्रह आहेत ते भरणे

आता कुंडली मांडायला सुरुवात करण्याआधी आपल्याला काही ज्योतिषीय भाषेतील विशिष्ट पदांची ओळख करून घेतली पाहिजे.

प्रथम कुंडली म्हणजे काय ते पाहू

- कुंडली हे आकाशाचे असे चित्र आहे की ज्यात ज्या वेळेची कुंडली असेल तेव्हाचे आकाशात असणारे ग्रह तारे राशी यांचे नक्की ठिकाण काय असेल त्याची छबी दिसेल.
- आकाशाचा गोल हा चौकोनी आकारात येथे सादर केला असून दिशा दर्शविल्या आहेत.
- आकाशात तेजस्वी झळकणारे ग्रह एकूण ७ आहेत. ते असे:
    - रवि
    - चंद्र
    - मंगळ
    - बुध
    - गुरु
    - शुक्र
    - शनि

  हे मूळ सप्तग्रह.
  आणि आभाळातील दोन काल्पनिक बिंदु आहेत की जे ग्रहाइतकेच परिणामकारक आहेत पण ते ग्रह नाहीत. परंतु त्यांच्या प्रचंड प्रभावामुळे ज्योतिषशास्त्र त्या दोन बिंदूंना ग्रहवत धरतात व ते सर्व मिळून नवग्रह मानले जातात. ते म्हणजे:

    - राहु
    - केतु
- बाकी चमचमते गोलक भरपूर आहेत. आपल्या ऋषीमुनींनी आभाळाच्या या गोलकांचा अभ्यास केल्यावर त्यांच्या लक्षात आले की ते ठराविक पद्धतीने एकत्र आलेले दिसतात.
- एरवी ग्रहांचा आभाळातील पत्ता सांगणे कठीण आहे. संदर्भ दिल्याखेरीज या गोल गोल ३६० अंशाच्या आभाळात कोणता ग्रह कोठे आहे हे सांगणे आजिबात सोपे नाही.
- यासाठी त्या ऋषीमुनींनी आभाळातील गोलकांना सारख्या भागात विभागून अभ्यासले व त्यांच्या लक्षात आले की हे गोलक स्थिर असून ग्रह त्यातून फिरतात.
- ग्रह हे ठराविक मार्गानेच ठराविक पट्टयातूनच फिरतात. तेही सूर्याच्या अवती भोवतीच असतात.
- सूर्य विशिष्ट मार्गानेच फिरतो व त्यास क्रांतिवृत्त म्हणतात.
- क्रांतिवृत्ताच्या दोन्ही बाजूला साडेसात अंश मोजल्यास १५ इंचाच्या पट्टयास क्रांतिमार्ग म्हणतात.
- इतके ठरविल्यावर तर कोणतेही ग्रह विशिष्ट वेळेला कोठे असतील याचा संदर्भ या गोलकांना नावे दिली तर सहज देता येईल.

बारा भागात विभागलेले हे गोलक बारा राशी म्हणून मानले गेले. त्यांच्या रांगोळीप्रमाणे दिसणाऱ्या विशिष्ट आकारावरून त्यांना विशिष्ट नावे दिली गेली. ती अशी:

१. मेष
२. वृषभ
३. मिथुन
४. कर्क
५. सिंह
६. कन्या

७.तुला
८.वृश्चिक
९.धनु
१०. मकर
११. कुंभ
१२. मीन

आता ग्रहांचा पत्ता सांगणे थोडे सोपे झाले. ग्रह मेषेला आहे वा सिंहेला आहे. यावरून त्या ग्रहाची आभाळातील स्थिती कळणे व सांगणे सुकर झाले. आभाळाचा गोल ३६० अंश व बारा भाग सारखे धरले तर प्रति राशी ३० अंश होतात. ग्रह मेषेला आहे म्हणजे मेष राशीच्या गोलकांमध्ये आहे. पण पूर्ण आभाळाचा विचार करता हे ३० अंश फारच विस्तीर्ण व खूप साऱ्या गोलकांना व्यापतात. म्हणून अधिक अचूकतेसाठी हे गोलकही अशाच पद्धतीने २७ भागात म्हणजेच नक्षत्रात विभागले गेले. आता प्रत्येक नक्षत्र झाले १३ अंश २० कलांचे. प्रत्येक नक्षत्रालाही नावे दिली गेली.


आपल्या आजच्या उद्देशात केवळ ठोकळा कुंडली मांडणे इतकेच असल्याने वरील माहिती पुरेशी आहे. आपला संबंध वर दिलेल्या आकृतीत राशी व ग्रह भरण्याशी आहे. वरील १२ भागात कोठे कोणती राशी भरायची व कोठे कोणता ग्रह भरावा हे समजले की झाली ठोकळा कुंडली.

वरील आकृतीतील १२ आकडे हे आकृतीचे १२ विभाग वा स्थाने वा भाव दर्शवितात. असे १२ आकडे प्रत्यक्षात भावांचे न लिहिता राशींचे लिहितात. म्हणजे असे की पहिला आकडा आहे ते स्थान तनुस्थान वा लग्न होय. लग्न म्हणजे कायम पहिला भाव.

या पहिल्या भावात पूर्व क्षितीजावर जी राशी त्या क्षणी आस्तित्वात असेल ती मांडावयाची असते. प्रथम भावातील आकडा हा कायम पूर्वेला उगवत असलेल्या राशीचा असतो. म्हणून ती राशी उगविण्याची सुरुवात होवून पूर्ण क्षितिजावर येवून पुढील राशी उगवण्यास सुरुवात होईपर्यंत म्हणजे सुमार २ तासांच्या अवधीत जी जी कुंडली मांडावी त्यात लग्न एकाच राशीचे येते. राशीचे नाव न

भरता नंबर भरण्याची पद्धत आहे. वरील आकृतीतील भावांच्या क्रमानेच राशी भरल्या जातात.

उदा. आपणास राशी भरावयाच्या आहेत. ज्या वेळेची कुंडली मांडायची त्या वेळी पूर्वक्षितीजावर सिंह रास आहे तर कुंडली पुढीलप्रमाणे मांडावी:





आता आपणास शिकायचे आहे ते पहिल्या भावातील म्हणजे लग्नातील राशी कशी ओळखावी

लग्नातील राशी ओळखण्यासाठी आपल्याला सोलापूरच्या दात्यांच्या पंचांगाची गरज आहे.

जातकाचा जन्मदिनांक २०१७ सालचा असल्याने आपणास दाते यांचे २०१७ – २०१८ सालचे पंचांग लागणार आहे.

पुढे या पंचांगाचा फोटो दिला आहे.





आत्ता पंचांगवाचन हा विषय नाही. आपल्या राशीमांडणीपुरता आवश्यक तेवढाच विषय येथे देत आहे.

पंचांगाचे मधले कोणतेही पृष्ठ काढले तर उजव्या बाजूच्या पानावर सर्वात वर पुढील ओळ असते

शके . . मास पक्ष सोलापूरचे दैनिक लग्न समाप्ति समय

२०१७ साली शक १९३९ असल्याने व श्रावण महिना असल्याने व कृष्ण पक्ष असल्याने पुढील ओळ या पानावर दिसते



**शक १९३९ श्रावण कृष्ण पक्ष सोलापूरचे दैनिक लग्न समाप्ति समय**

| 2017 | समय प्रातःकालनंतरचे | | | | | | समय सायंकालनंतरचे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑग | कर्क | सिंह | कन्या | तुला | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन | मेष |
| 8 | ०६।४७ | ०८।५४ | ११।०० | ०१।१० | ०३।२४ | ०५।३० | ०७।२० | ०८।५८ | १०।३४ | १२।१९ |
| 9 | ०६।४४ | ०८।५० | १०।५६ | ०१।०६ | ०३।२० | ०५।२६ | ०७।१६ | ०८।५४ | १०।३० | १२।१५ |


त्याखालील आडव्या रकान्याचे दोन भाग केलेले असतात. एक समय प्रात:कालनंतरचे व दुसरा समय सायंकालनंतरचे असे ते दोन भाग होत

त्याखालील आडव्या रकान्याचे १३ भाग असून पहिला रकाना महिना सांगतो व बाकी १२ रकाने १२ राशींच्या नावाचे असता५

या खाली एक कोष्टक असते.

तेरा रकान्यांच्या या कोष्टकात पहिला रकाना तारखेचा असतो व पुढील रकाने आकडयांचे असतात. हे आकडे एकूण चार असून दोन आकडयांमध्ये दंड असतो.

पहिले दोन आकडे तास सांगतात व नंतरचे मिनिटे सांगतात.



शक १९३९ श्रावण कृष्ण पक्ष सोलापूरचे दैनिक लग्न समाप्ति समय

| 2017 | समय प्रातःकालनंतरचे | | | | | | समय सायंकालनंतरचे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑग | कर्क | सिंह | कन्या | तुला | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन | मेष |
| 8 | ०६।४७ | ०८।५४ | ११।०० | ०१।१० | ०३।२४ | ०५।३० | ०७।२० | ०८।५८ | १०।३४ | १२।१९ |
| 9 | ०६।४४ | ०८।५० | १०।५६ | ०१।०६ | ०३।२० | ०५।२६ | ०७।१६ | ०८।५४ | १०।३० | १२।१५ |
| 10 | ०६।४० | ०८।४६ | १०।५२ | ०१।०२ | ०३।१६ | ०५।२२ | ०७।१३ | ०८।५० | १०।२६ | १२।११ |
| 11 | ०६।३६ | ०८।४३ | १०।४८ | १२।५८ | ०३।१२ | ०५।१८ | ०७।०९ | ०८।४७ | १०।२२ | १२।०७ |
| 12 | ०६।३२ | ०८।३९ | १०।४४ | १२।५४ | ०३।०८ | ०५।१४ | ०७।०५ | ०८।४३ | १०।१८ | १२।०३ |
| 13 | ०६।२८ | ०८।३५ | १०।४० | १२।५० | ०३।०४ | ०५।१० | ०७।०१ | ०८।३९ | १०।१४ | ११।५९ |
| 14 | ०६।२४ | ०८।३१ | १०।३६ | १२।४६ | ०३।०० | ०५।०६ | ०६।५७ | ०८।३५ | १०।१० | ११।५५ |
| 15 | ०६।२० | ०८।२७ | १०।३२ | १२।४३ | ०२।५६ | ०५।०३ | ०६।५३ | ०८।३१ | १०।०६ | [illegible] |
| 16 | ०६।१६ | ०८।२३ | १०।२८ | १२।३९ | ०२।५२ | ०४।४९ | ०६।४९ | ०८।२७ | १०।०३ | [illegible] |
| 17 | ०६।१२ | ०८।१९ | १०।२५ | १२।३५ | ०२।४८ | ०४।४५ | ०६।४५ | ०८।२३ | ०९।५९ | [illegible] |

आपली इच्छित तारीख १५ ऑगस्ट २०१७

वर फोटो दिलेल्या पंचांगात ही तारीख पृष्ठ क्र ४७ वर आहे.

आपण ऑगस्ट या महिन्याच्या नावाखाली १५ तारीख पाहिल्यास कर्क या पुढच्या रकान्यात ०६ । २० असे आकडे दिसतात.


याचा अर्थ असा की १५ ऑगस्ट रोजी सकाळी सहा वाजून वीस मिनिटांनी कर्क हे लग्न संपले. हे लाल रेषेने दर्शविले आहे.

लग्नसमाप्ति म्हणजे पूर्वक्षितिजावर कर्क ही रास सकाळी सहा वाजून वीस मिनिटांपर्यंत होती. त्यानंतर सकाळी सहा वाजून वीस मिनिटे पूर्ण झाल्या झाल्या सिंह रास उगवायला म्हणजे उदित व्हायला सुरुवात झाली.

दिलेली वेळ सकाळची की संध्याकाळची याविषयी साशंकता नाही कारण दोन्ही वेगवेगळे विभाग आहेत.

सायंकाळच्या विभागात सहा वाजून त्रेपन्न मिनिटांपर्यंत मकर लग्न होते. ते निळया रेषेने दर्शविले आहे.

तारखेच्या पुढील सर्व रकाने लग्नसमाप्ति समय म्हणजे घडयाळातील वेळ दाखवितात.



शक १९३९ श्रावण कृष्ण पक्ष सोलापूरचे दैनिक लग्न समाप्ति समय

| 2017 | समय प्रातःकालनंतरचे | | | | | | समय सायंकालनंतरचे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑग | कर्क | सिंह | कन्या | तुला | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन | मेष |
| 8 | ०६।४७ | ०८।५४ | ११।०० | ०१।१० | ०३।२४ | ०५।३० | ०७।२० | ०८।५८ | १०।३४ | १२।१९ |
| 9 | ०६।४४ | ०८।५० | १०।५६ | ०१।०६ | ०३।२० | ०५।२६ | ०७।१६ | ०८।५४ | १०।३० | १२।१५ |
| 10 | ०६।४० | ०८।४६ | १०।५२ | ०१।०२ | ०३।१६ | ०५।२२ | ०७।१३ | ०८।५० | १०।२६ | १२।११ |
| 11 | ०६।३६ | ०८।४३ | १०।४८ | १२।५८ | ०३।१२ | ०५।१८ | ०७।०९ | ०८।४७ | १०।२२ | १२।०७ |
| 12 | ०६।३२ | ०८।३९ | १०।४४ | १२।५४ | ०३।०८ | ०५।१४ | ०७।०५ | ०८।४३ | १०।१८ | १२।०३ |
| 13 | ०६।२८ | ०८।३५ | १०।४० | १२।५० | ०३।०४ | ०५।१० | ०७।०१ | ०८।३९ | १०।१४ | ११।५९ |
| 14 | ०६।२४ | ०८।३१ | १०।३६ | १२।४६ | ०३।०० | ०५।०६ | ०६।५७ | ०८।३५ | १०।१० | ११।५५ |
| 15 | ०६।२० | ०८।२७ | १०।३२ | १२।४३ | ०२।५६ | ०५।०३ | ०६।५३ | ०८।३१ | १०।०६ | ११।५[illegible] |
| 16 | ०६।१६ | ०८।२३ | १०।२८ | १२।३९ | ०२।५२ | ०४।५९ | ०६।४९ | ०८।२७ | १०।०३ | ११।४[illegible] |
| 17 | ०६।१२ | ०८।१९ | १०।२४ | १२।३५ | ०२।४८ | ०४।५५ | ०६।४५ | ०८।२३ | ०९।५९ | ११।४[illegible] |


आपली इच्छित तारीख १५ ऑगस्ट व वेळ दुपारी १२ ची. या चित्रात दर्शविल्याप्रमाणे तुला लग्न हे १२ वाजून ४३ मिनिटांनी संपले. त्याआधीचे कन्या लग्न १० वाजून ३३ मिनिटांनी संपले.

तेव्हा तुला लग्न १० वाजून ३३ मिनिटे संपल्या संपल्या सुरू झाले व ते १२ वाजून ४३ मिनिटांनी संपले.

अर्थात बारा वाजता तुला लग्न होते. त्यामुळे कुंडलीच्या आकृतीत प्रथम भावात तुला राशीचा ७ आकडा टाकणे आवश्यक आहे.

परंतु आपले ठिकाण आहे पुणे. ही लग्न समाप्ति दिली आहे सोलापूर येथील. मग हे निश्चित करणे भाग आहे की काढलेले लग्न पुण्यातही तेच होते का?

ते करण्यासाठी याच पंचांगाचे पृष्ठ क्र १०० काढावे लागेल



ांची लग्न समाप्ति काढण्याचे कोष्टक (कोष्टक २)

| मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|
| -१ | -१ | -१ |
| +८ | +५ | +१ |
| -३ | -६ | -१० |
| -१५ | -२२ | -३० |
| +२० | +१५ | +१० |
| +७ | +५ | +४ |
| -१ | -३ | -६ |
| +६ | +३ | +१ |
| +१४ | +१३ | +१२ |
| +३ | -६ | -१५ |
| +६ | +१ | -४ |
| +५ | +६ | +७ |
| +७ | +२ | -३ |
| +१ | ० | -१ |
| -४५ | -४९ | -५४ |
| -८ | -१६ | -२५ |
| +४ | +६ | +९ |
| +१३ | +११ | +१० |
| -९ | -२ | +४ |
| +६ | +७ | +८ |

| गाव | मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या | तुला | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त्र्यंबक | +६ | +५ | +६ | +७ | +१० | +१२ | +१४ | +१५ | +१४ | +१३ | +१० | +८ |
| दिल्ली | -२३ | -२८ | -२६ | -१८ | -७ | +४ | +१३ | +१८ | +१६ | +८ | -३ | -१४ |
| देवास | -८ | -११ | -१० | -६ | -१ | +४ | +८ | +११ | +१० | +६ | +१ | -४ |
| धुळे | ० | -२ | -१ | +१ | +४ | +८ | +१० | +१२ | +११ | +९ | +६ | +२ |
| धारवाड | +७ | +८ | +७ | +६ | +४ | +३ | +१ | ० | +१ | +२ | +४ | +५ |
| नाशिक | +५ | +४ | +५ | +६ | +९ | +११ | +१३ | +१४ | +१३ | +१२ | +९ | +७ |
| नांदेड | -९ | -९ | -९ | -८ | -६ | -५ | -३ | -३ | -३ | -४ | -६ | -७ |
| नागपूर | -१९ | -२० | -२० | -१७ | -१४ | -१० | -७ | -६ | -६ | -९ | -१२ | -१६ |
| परभणी | -६ | -६ | -६ | -५ | -३ | -२ | ० | ० | ० | -१ | -३ | -४ |
| पणजी (गोवा) | +१२ | +१३ | +१२ | +११ | +९ | +८ | +६ | +५ | +६ | +७ | +९ | +१० |
| पुणे | +७ | +६ | +६ | +७ | +८ | +९ | +९ | +१० | +१० | +९ | +८ | +७ |
| पठण | ० | -१ | ० | +१ | +३ | +४ | +६ | +७ | +६ | +५ | +३ | +२ |
| पंढरपूर | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ | +३ |
| बिदर | -७ | -७ | -७ | -६ | -६ | -६ | -५ | -५ | -५ | -६ | -६ | -६ |
| बीड | -१ | -२ | -२ | -१ | +१ | +२ | +३ | +४ | +४ | +३ | +१ | ० |
| बुलढाणा | -६ | -७ | -६ | -४ | -२ | +१ | +४ | +५ | +४ | +२ | ० | -३ |
| बेळगांव | +९ | +९ | +९ | +८ | +६ | +५ | +३ | +३ | +३ | +४ | +६ | +७ |
| बंगलोर | ० | +१ | +१ | -२ | -६ | -१० | -१४ | -१५ | -१५ | -१२ | -८ | -४ |
| भुसावळ | -४ | -६ | -५ | -३ | ० | +४ | +६ | +८ | +७ | +५ | +२ | -२ |
| भोपाळ | -१५ | -१७ | -१६ | -१२ | -७ | -२ | +३ | +५ | +४ | ० | -५ | -१० |
| मुंबई | +११ | +१० | +१० | +११ | +१३ | +१४ | +१५ | +१६ | +१६ | +१५ | +१३ | +१२ |

चित्रात दाखविल्याप्रमाणे कोष्टक मिळेल. त्यात पुणे या शहराच्या पुढे तुला लग्न शोधल्यास +९ असा आकडा मिळेल.

याचा अर्थ सोलापूरची जी लग्नसमाप्ति वेळ मिळाली आहे त्यात ९ मिनिटे अधिक केल्यास पुण्याची लग्नसमाप्ति वेळ मिळेल. १५ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी ते १२ वाजून ४३ मिनिटांनी सोलापूर येथे तुला लग्नसमाप्ति झाली. पुण्याची काढावयाची

झाल्यास आपल्याला ते १२ वाजून ४३ मिनिटांमध्ये ९ मिनिटे अधिक करावयाची आहेत म्हणजे पुण्याची लग्नसमाप्ति वेळ सिद्ध होईल. तेव्हा १२। ४३ + ००। ०९ = १२। ५३ म्हणजेच पुण्यात हे लग्न १२। ५३ पर्यंत होते.

मग हे सुरू केव्हा झाले?


कन्या लग्न संपल्यावर.

कन्यासमाप्ति वेळ १०। ३२ सोलापूरला.

कोष्टक नियमाप्रमाणे कन्येखाली +९ असल्याने त्यात ९ मिनिटे मिसळणे आवश्यक. म्हणून कन्यासमाप्ति १०। ३२ + ००। ०९ = १०। ४१ म्हणून पुण्यात तुला लग्न १०। ४१ ते १२। ५३ असे होते.

तेव्हा पुण्यात १२ वाजता तुला लग्नच होते हे निश्चित झाले.

आता कुंडलीच्या आकृतीत आपल्याला प्रथम भावात ७ हा आकडा टाकून बाकी राशी भरावयाच्या आहेत. ती आकृति अशी दिसेल:



आता राशी भरून झाल्यावर आपल्याला आकृतीत ग्रह भरावयाचे आहेत.

यासाठी पुन्हा पंचांगाचे पृष्ठ क्र ४७ काढावे लागेल. राशींच्या कोष्टकाखाली अजून एक कोष्टक दिले आहे.

सालापूरचे दैनिक लग्न समाप्ति समय (४७) तारीख, ग्रहन

| 2017 | समय प्रातःकालनंतरचे | | | | | | समय सायंकालनंतरचे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑग | कर्क | सिंह | कन्या | तुला | वृश्चिक | धनु | मकर | कुंभ | मीन | मेष | वृषभ | मिथुन |
| 8 | ०६।४७ | ०८।५४ | ११।०० | ०१।१० | ०३।२४ | ०५।३० | ०७।२० | ०८।५८ | १०।३४ | १२।१९ | ०२।१९ | ०४।३१ |
| 9 | ०६।४४ | ०८।५० | १०।५६ | ०१।०६ | ०३।२० | ०५।२६ | ०७।१६ | ०८।५४ | १०।३० | १२।१५ | ०२।१५ | ०४।२७ |
| 10 | ०६।४० | ०८।४६ | १०।५२ | ०१।०२ | ०३।१६ | ०५।२२ | ०७।१३ | ०८।५० | १०।२६ | १२।११ | ०२।११ | ०४।२३ |
| 11 | ०६।३६ | ०८।४३ | १०।४८ | १२।५८ | ०३।१२ | ०५।१८ | ०७।०९ | ०८।४७ | १०।२२ | १२।०७ | ०२।०७ | ०४।१९ |
| 12 | ०६।३२ | ०८।३९ | १०।४४ | १२।५४ | ०३।०८ | ०५।१४ | ०७।०५ | ०८।४३ | १०।१८ | १२।०३ | ०२।०३ | ०४।१६ |
| 13 | ०६।२८ | ०८।३५ | १०।४० | १२।५० | ०३।०४ | ०५।१० | ०७।०१ | ०८।३९ | १०।१४ | ११।५९ | ०१।५९ | ०४।१२ |
| 14 | ०६।२४ | ०८।३१ | १०।३६ | १२।४६ | ०३।०० | ०५।०६ | ०६।५७ | ०८।३५ | १०।१० | ११।५५ | ०१।५५ | ०४।०८ |
| 15 | ०६।२० | ०८।२७ | १०।३२ | १२।४३ | ०२।५६ | ०५।०३ | ०६।५३ | ०८।३१ | १०।०६ | ११।५१ | ०१।५१ | ०४।०४ |
| 16 | ०६।१६ | ०८।२३ | १०।२८ | १२।३९ | ०२।५२ | ०४।५९ | ०६।४९ | ०८।२७ | १०।०३ | ११।४७ | ०१।४७ | ०४।०० |
| 17 | ०६।१२ | ०८।१९ | १०।२५ | १२।३५ | ०२।४८ | ०४।५५ | ०६।४५ | ०८।२३ | ०९।५९ | ११।४३ | ०१।४४ | ०३।५६ |
| 18 | ०६।०८ | ०८।१५ | १०।२१ | १२।३१ | ०२।४४ | ०४।५१ | ०६।४१ | ०८।१९ | ०९।५५ | ११।३९ | ०१।४० | ०३।५२ |
| 19 | ०६।०४ | ०८।११ | १०।१७ | १२।२७ | ०२।४० | ०४।४७ | ०६।३७ | ०८।१५ | ०९।५१ | ११।३५ | ०१।३६ | ०३।४८ |
| 20 | ०६।०० | ०८।०७ | १०।१३ | १२।२३ | ०२।३७ | ०४।४३ | ०६।३३ | ०८।११ | ०९।४७ | ११।३१ | ०१।३२ | ०३।४४ |
| 21 | ०५।५६ | ०८।०३ | १०।०९ | १२।१९ | ०२।३३ | ०४।३९ | ०६।२९ | ०८।०७ | ०९।४३ | ११।२७ | ०१।२८ | ०३।४० |
| 22 | ०५।५२ | | | | | | | | | | | |

| ऑ | | |
|---|---|---|
| 9 | आश्ले ३ | २६। |
| 13 | आश्ले ४ | १३। |
| 16 | मघा १ | २४। |
| 20 | मघा २ | ११। |
| ऑ | | मंग |
| 11 | आश्ले २ | १६। |
| 16 | आश्ले ३ | २१। |
| 21 | आश्ले ४ | २६। |
| ऑ | | बु |
| 8 | पूर्वा २ | १८। |
| 17 | पूर्वा १ | १५। |
| गुरु | चित्रा १ | म |

2017 ऑग — सकाळी ५।३० चे दैनिक ग्रह चंद्रक्रांति व ग्रीनिच ० ची सांपाति

| ऑग | रवि | चंद्र | क्रांति | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | राहु |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | ०३।२१।३३।०८ | ०९।२४।२१।१९ | −१५ | ०३।१७।४७ | ०४।१६।२८ | ०५।२३।५३ | ०२।१४।२७ | ०७।२७।२० | ०४।००।०५ |
| 9 | ०३।२२।३०।३७ | १०।०६।५९।५४ | −१२ | ०३।१८।२६ | ०४।१६।५० | ०५।२४।०२ | ०२।१५।३७ | ०७।२७।१८ | ०४।००।०५ |
| 10 | ०३।२३।२८।०८ | १०।१९।५१।२९ | −०८ | ०३।१९।०४ | ०४।१७।०८ | ०५।२४।११ | ०२।१६।४७ | ०७।२७।१६ | ०४।००।०५ |
| 11 | ०३।२४।२५।४० | ११।०२।५६।३६ | −०४ | ०३।१९।४२ | ०४।१७।२१ | ०५।२४।२० | ०२।१७।५७ | ०७।२७।१५ | ०४।००।०५ |
| 12 | ०३।२५।२३।१३ | ११।१६।१५।३२ | +०१ | ०३।२०।२१ | ०४।१७।३० | ०५।२४।३० | ०२।१९।०८ | ०७।२७।१४ | ०४।००।०६ |
| 13 | ०३।२६।२०।४८ | ११।२९।४८।२४ | +०५ | ०३।२०।५९ | ०४।१७।३२ | ०५।२४।३९ | ०२।२०।१८ | ०७।२७।१२ | ०४।००।०६ |
| 14 | ०३।२७।१८।२४ | ००।१३।३५।०३ | +०९ | ०३।२१।३८ | ०४।१७।३० | ०५।२४।४८ | ०२।२१।२९ | ०७।२७।११ | ०४।००।०६ |
| 15 | ०३।२८।१६।०२ | ००।२७।३४।५३ | +१३ | ०३।२२।१६ | ०४।१७।२२ | ०५।२४।५८ | ०२।२२।३९ | ०७।२७।१० | ०४।००।०७ |
| 16 | ०३।२९।१३।४१ | ०१।११।४६।३५ | +१६ | ०३।२२।५४ | ०४।१७।०८ | ०५।२५।०८ | ०२।२३।५० | ०७।२७।०९ | ०४।००।०७ |
| 17 | ०४।००।११।२२ | ०१।२६।०८।०० | +१८ | ०३।२३।३३ | ०४।१६।४९ | ०५।२५।१७ | ०२।२५।०० | ०७।२७।०८ | ०४।००।०७ |

या कोष्टकावर सकाळी ०५। ३० वाजताचे दैनिक ग्रह ग्रीनिच ० चे म्हणजे निरयन स्वरूपाचे दिले आहेत. ते संस्कार न करता तसेच घ्यावयाचे आहेत.


तारखेसमोर आकडे दिले आहेत ते ग्रहांच्या राशी अंश कला व विकला दर्शवितात जे दंडाने वेगळे केले आहेत.

रवि या ग्रहाखाली १५ तारखेला ०३। २८। १६। ०२ असे आकडे आहेत.

याचा अर्थ रवि या ग्रहाने सकाळी ०५। ३० वाजता ०३ राशी समाप्त केल्या, २८ अंश समाप्त केले व १६ कला संपून तो ०२ विकला पुढे आला आहे.

ठोकळा कुंडलीसाठी आपल्याला यातील फक्त पहिला आकडा महत्वाचा.

रवि या ग्रहाने ०३ राशी समाप्त केल्या म्हणजे तो सांप्रत ४थ्या राशीत आहे म्हणजे कर्केत आहे. कुंडली आकृतीत रवि या ग्रहाची स्थापना ४ आकडा जेथे असेल तेथे करावी.




याप्रमाणे चंद्राचा पहिला आकडा येतो ०० म्हणजे १२ राशी पूर्ण करून तो मेषेला आहे. तो तेथे स्थापित करावा. याच नियमाप्रमाणे मंगळ येतो कर्केला. बुध सिंहेला, गुरु कन्येला, शुक्र मिथुनेला, शनि वृश्चिकेला, राहु सिंहेला व केतु कुंभेला.

पंचांगात केवळ राहु देतात. तो जिथे आहे ते स्थान १ मोजून ७ व्या स्थानात केतु लिहावा

अशी मांडतात ठोकळा कुंडली.